## MAHARASHTRA ACT No. XL OF 1964

## BOMBAY MATERNITY BENEFIT HYDERABAD MATERNITY BENEFIT AND CENTRAL PROVINCES AND BERAR MATERNITY BENEFIT (REPEAL) ACT, 1964

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १७ ऑक्टोबर १९६४ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**बी. पी. दलाल,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XL OF 1964

AN ACT TO REPEAL THE BOMBAY MATERNITY BENEFIT ACT, 1929, THE HYDERABAD MATERNITY BENEFIT ACT, AND THE CENTRAL PROVINCES MATERNITY BENEFIT ACT, 1930 AS APPLICABLE TO FACTORIES.

## सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०

[ राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात" दिनांक २१ माहे ऑक्टोबर १९६४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ].

**कारखान्यास लागू असलेला मुंबई प्रसूति सहाय्य अधिनियम, १९२९, हैदराबाद प्रसूति सहाय्य अधिनियम, आणि मध्यप्रांत व वऱ्हाड प्रसूति सहाय्य अधिनियम, १९३० रद्द करण्याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, कारखान्यांस लागू असलेला मुंबई प्रसूति सहाय्य अधिनियम, १९२९, हैदराबाद प्रसूति सहाय्य अधिनियम, आणि मध्यप्रांत व वऱ्हाड प्रसूति सहाय्य अधिनियम, १९३० रद्द करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, मुंबई प्रसूति सहाय्य, हैदराबाद प्रसूति सहाय्य व मध्यप्रांत व वऱ्हाड प्रसूति सहाय्य (रद्द करणे) अधिनियम, १९६४ असे म्हणावे. लघु संज्ञा.

२. ह्या राज्यातील कारखान्यांना प्रसूति सहाय्य अधिनियम, १९६१ लागू करण्यात आल्यानंतर, कारखान्यांस लागू असलेला मुंबई प्रसूति सहाय्य अधिनियम, १९२९, हैदराबाद प्रसूति सहाय्य अधिनियम, आणि मध्यप्रांत व वऱ्हाड प्रसूति सहाय्य अधिनियम, १९३०, हे अधिनियम प्रसूति सहाय्य अधिनियम, १९६१ याच्या कलम २७ च्या उपबंधास अधीन राहून, रद्द होतील. सन १९२९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, सन १३४९ फसलीचा हैदराबाद अधिनियम क्रमांक ७, सन १९३० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ६, रद्द करणे.

(यथार्थ अनुवाद)

**ना. ना. पंडित,**
भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.